<u>दिवाणी किरकोळ अर्ज क्रमांक ५२/२०२६.</u>
<u>सखुबाई कसबे व ईतर वि. निरंक</u>
<u>CNR No : MHBI130002192026.</u>
<u>:: निशाणी क्रमांक ०१ वरील आदेश ::</u>

प्रस्तुतचा अर्ज हा बॉम्बे रेग्युलेशन कायदा, १८२७ चे कलम २ अन्वये वारस प्रमाणपत्र मिळण्याबाबत दाखल केला आहे.

०२. अर्जदार क्र. १ चे पती व अर्जदार क्र. २ व ३ चे वडील नामे **भारत विश्वनाथ कसबे** हे दिनांक ३१/१०/२००३ रोजी मयत झाले आहेत. मयत **भारत विश्वनाथ कसबे** यांची आई ही पूर्वीच मयत झालेली आहे. मयत **भारत विश्वनाथ कसबे** यांचे अर्जदार हेच कायदेशिर वारस असुन मयतास अर्जदारांशिवाय ईतर कोणीही वारस नाही. अर्जदारांना विविध शासकीय व निमशासकीय कार्यालयात दाखल करण्यासाठी कायदेशीर वारस असल्याबाबतचे वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे.

०३. प्रकरणात आदेश पारीत करून दिनांक ३१/०१/२०२६ रोजीचे दैनिक **"वैद्यनाथ वार्ता"** या वर्तमानपत्रात सदर प्रकरणाबाबत जनतेस जाहीर नोटीस बजाविण्यात आले. त्या वर्तमानपत्राची आवृत्ती नि. ०८ वर अभिलेखावर दाखल आहे.

०४. अर्जदार क्र. ०२ यांनी त्यांचा पुरावा निशाणी क्र. ०९ प्रमाणे अभिलेखावर दाखल केला आहे. अर्जदारांची पुरावा संपल्याची पुरसीस निशाणी क्र. ११ वर आहे. अर्जदार हेच मयत **भारत विश्वनाथ कसबे** यांचे कायदेशिर वारस आहेत. अर्जदारांनी मयत **भारत विश्वनाथ कसबे** यांचे मृत्यु प्रमाणपत्र नि.क्र. ०६ वर, कुटूंब मर्यादा प्रमाणपत्र नि.क्र. ०७ वर व अर्जदार यांचे आधार कार्ड च्या प्रती अभिलेखावर दाखल केल्या आहेत.

०५. जनतेस जाहीर नोटीस देवुन सुध्दा आजपावेतो वारसप्रमाणपत्र देण्याबाबत कोणतेच आक्षेप न्यायालयास प्राप्त झाले नाही. म्हणुन अभिलेखावरील तोंडी व कागदोपत्री पुराव्यावरून अर्जदार हेच मयताचे कायदेशिर वारस असल्याचे दिसुन येते. म्हणुन खालील आदेश पारीत.

## :: आदेश ::

०१. अर्ज मंजुर.

०२. न्यायालयीन शुल्क भरल्यानंतर बॉम्बे रेग्युलेशन कायदा, १८२७ मधील अपेन्डीक्स-बी प्रमाणे **अर्जदार क्र. ०१. सखुबाई भ्र. भारत कसबे, ०२. वैजनाथ पि. भारत कसबे आणि ०३. आकाश पि. भारत कसबे** यांना मयत **भारत विश्वनाथ कसबे** यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र निर्गमित करण्यात यावे.

०३. बॉम्बे रेग्युलेशन कायदा, १८२७ चे कलम ८ अन्वये दिल्या जाणा-या प्रमाणपत्रासोबत दिवाणी नियमावली परिच्छेद ३१२ मध्ये दिलेल्या सुचना जोडाव्यात.

Digitally signed by DATTAPRASAD YASHVANT RAIRIKAR
Date: 2026.03.12 12:24:14 +0530

दिनांक – १२/०३/२०२६.
ठिकाण - परळी वैजनाथ.

**( डी. वाय. रायरीकर )**
सहदिवाणी न्यायाधीश (कनिष्ठ स्तर)
परळी वैजनाथ

---

:: **Certificate of Stenographer** ::

"I affirm that the contents of this PDF file are word to word as per original Order."

Dictated On : 12/03/2026.
Transcribed On : 12/03/2026.
Checked & Signed On : 12/03/2026.
Date : 12/03/2026.
Place : Parli Vaijnath.

Digitally signed by GUPTA SACHIN SATISH
Date: 2026.03.12 12:25:52 +0530

**( Sachin S. Gupta )**
Stenographer (Grade – 3)
Civil Court (Junior Division) & J.M.F.C.
Parli Vaijnath (MHBI-13)